# महाराष्ट्र शासन
# जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय
# बारदाना विक्रीची जाहिरात ई – निविदा

**विषय :-** नागपूर जिल्हयाअंतर्गत पुरवठा विभाग ग्रामीण यांचे अधिनस्थ शासकिय धान्या गोदामात जून 2013 ते मार्च 2017 या कालावधीतील साठवणूकीत असलेला उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदाना विल्हेवाटीबाबत.

नागपूर ग्रामीण जिल्हयांतील तहसिल स्तरावरील शासकीय गोदामात शासकीय धान्य गोदामात साठवणूकीस असलेला उपयोगी, निरुपयोगी व तूकड बारदाना खरेदीकरीता इच्छुक व्यक्ती/ संस्थाकडुन विहीत नमून्यात ई – निविदा मागविण्यात येत आहे.

**<u>विल्हेवाट लावावयाच्या बारदान्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.</u>**

| अ.क्र. | तपशिल | उपयोगी 50 किलो भरतीचा | निरुपयोगी 50 किलो भरतीचा | प्लॅस्टीक उपयोगी 50 किलो भरतीचा | तुकडा बारदाना (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विक्रीस उपलब्ध बारदाना नग | 23785 | 84311 | 1498 | 62.99 |
| 2 | हातची किंमत प्रति नग | 7.49 | 3.83 | 2.23 | 1.97 |

**<u>ई- निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक</u>**

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ई – निविदा भरणे | 8/1/2018 सकाळी 10.00 पासून ते 20/1/2018 दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| 2 | ई – निविदा फार्म शुल्क व इसारा रक्कम Online किंवा धनाकर्षाव्दारे भरणे | 8/1/2018 सकाळी 10.00 पासून ते 20/1/2018 दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| 3 | ई – निविदा उघडणे | 22/1/2018 दुपारी 3.00 वाजेपासून |

इच्छूक निविदाकारासोबत Pre-bid conference दिनांक 11/1/2018 रोजी दुपारी 3.00 वाजता जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर यांचे कक्षात आयोजीत करण्यांत येईल. त्यामध्ये निविदेच्या अटी व शर्ती व ई

— निविदेबाबत तपशिलवार माहिती निविदाकारांना देण्यांत येईल तसेच त्यांचे इतर अडचणी व शंका यांचे समाधान करण्यांत येईल.

विषयांकित निविदेची सविस्तर माहिती तसेच निविदेच्या अटी व शर्ती आणि अर्जाचा नमूना (निविदासंच) www.mahatenders.gov.in व www.nagpur.nic.in या संकेतस्थळावर दिनांक 8/1/2018 पासून उपलब्ध राहील.

1. निविदा फॉर्म विक्री किंमत रुपये 1000/- राहील.
2. इसारा रक्कम रु .40,000/- राहील.

कोणतेही कारण नमूद न करता निविदा प्रक्रिया रद्द करणे, वेळापत्रकात बदल करणे इत्यादी संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी
नागपूर

# निविदेच्या अटी व शर्ती

१. नागपूर ग्रामीण पुरवठा विभागअधिनस्थ सर्व शासकिय धान्य गोदामात साठवणूकीत असलेला व निविदेत नमुद रिकामा बारदाना ज्या ठिकाणी व ज्या स्थितीत आहे त्या ठिकाणावरुन उचल करावा लागेल. निविदा मंजूर झाल्यास उक्त बारदाना निविदाधारकास स्वखर्चाने उचल करणे बंधनकाराक राहील. कोणत्याही परिस्थितीत बारदाना निवडुन घेता येणार नाही.

२. गोदामातील बारदाना कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळी निविदाधारकांस संबंधीत गोदामात पहावयास मिळेल.

३. नागपूर जिल्हयातील तालुका स्तरावरील पुरवठा विभागाचे शासकीय धान्य गोदामात निविदेत दर्शविलेल्या उपलब्ध बारदान्याची प्रत्यक्ष पाहणी करुन समाधान केल्यानंतरच निविदाकाराने निविदा भरावी. निविदेनंतर कोणतेही कारण किंवा उजर मान्य करण्यात येणार नाही.

४. एखादा बारदाना हा उपयोगी, निरुपयोगी किंवा तूकडा आहे किंवा कसे? हे ठरविण्याचे अधिकार जिल्हा पुरवठा अधिकारी यांना राहिल. या बाबतीत त्यांचा निर्णय अंतीम राहील व त्यानूसार बारदान्याची उचल करणे यशस्वी निविदाधारकास बंधनकारक राहील.

५. यशस्वी निविदाकाराने बारदाना ताब्यात घेतल्यानंतर त्याच नूकसान झाल्यास त्याची जबाबदारी शासनाची राहणार नाही. एकदा बारदाना ताब्यात घेऊन उचल केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव बारदाना परत घेतल्या जाणार नाही.

६. नागपूर ग्रामीण पुरवठा विभाग अधिनस्थ सर्व गोदामातील साठवणूकीत असलेल्या सर्व प्रतवारीच्या बारदान्याकरीता निविदा भरणे आवश्यक राहील. निविदेसोबत ई - निविदेतील सूचनेत नमूद केल्यानूसार निविदा फार्म फी रु 1000 Online व्दारे विहीत मुदतीत म्हणेच दिनांक 20/1/2018 चे दुपारी 02.00 वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक राहील.

७. इसारा रक्कम रुपये 40,000/- राहील. ईसा-याची रक्कम ऑनलाईन किंवा धनाकर्ष रुपात भरण्यात यावी, इसारा रक्कम जिल्हाधिकारी नागपूर यांचे नावे भरणा करावी. ईसा-याची रक्कम धनाकर्ष स्वरुपात भरणा केल्यास सदर मुळ धनाकर्ष जिल्हा पुरवठा अधिकारी नागपूर यांचेकडे दिनांक 20/1/2018 चे दुपारी 02.00 वाजेपर्यंत प्रत्यक्षात जमा करणे बंधनकारक राहील.

८. ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांची इसा-याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाधारकास रुपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर अटी व शर्तीबाबतचा करारनामा करुन दयावा लागेल. तत्पूर्वी बारदान्याच्या किंमतीच्या 03 टक्के सुरक्षा ठेव (अनामत) म्हणून भरणा करावी लागेल.

१०. निविदा अंतीमत: मंजूर झाल्यानंतर बारदाना प्रथम विक्रीचे वेळी त्या किंमतीवर बारदाना किंमतीचे 1 टक्के उलाढाल करासह, G.S.T 5 % वसुलीस पात्र राहील. निविदा अंतिमत : मंजूर झाल्यानंतर बारदान्याच्या किंमतीची संपूर्ण रक्कम सात दिवसाचे आत भरणा करुन व लगेच करारनामा करुन त्यानंतर 30 दिवसांत संपूर्ण बारदान्याची उचल करणे यशस्वी निविदाधारकांस बंधनकारक राहील. विक्रीकराबाबत शासनाचे आदेश/ सूचना निविदारकास बंधनकारक राहील.

११. कोणत्याही कारणास्तव रक्कम हप्ता पदध्दतीने भरण्याची मुभा दिली जाणार नाही किंवा तशी विनंती यशस्वी निविदाकारास करता येणार नाही. पूर्ण रक्कमेचा भरण केल्यानंतर व करारनामा केल्यानंतर बारदाना उचलीचे आदेश दिले जातील. एकदा भरणा केलेली रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१२. ई–निविदेसाठी अनुसरावयाची कार्यपदध्ती आणि मार्गदर्शक सुचना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल त्यानुसार निविदाकाराने कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

१३. बारदाना विक्री निविदेकरीता व्दि लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल यामध्ये पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा असेल. ज्यामध्ये निविदाकराची पात्रता सिध्द करणारे पुरावे व निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरीत केले असल्याचे दरस्ताऐवज असतील. दुसरा लिफाफा हा दरविषयक असेल ज्यात निविदाकार आपले दर नमुद करेल.

**१४.तांत्रिक लिफाफा " अ " मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे online सादर करावीत.**

| | |
|---|---|
| 1 | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 अंतर्गत आस्थापनाचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| 2 | भागीदारी फर्म/सहकारी संस्था असल्यास त्याबाबतचा करारनामा/नियमावली. |
| 3 | इसारा रक्कमेचा धनाकर्ष (ऑनलाईन भरली नसेल अशावेळी) |
| 4 | निविदाकाराचा PAN क्रमांक अथवा TAN क्रमांक याची साक्षंकित प्रत |
| 5 | निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे व त्यास बांधील असल्याचे शपथपत्र रु.100/- चे स्टॅम्पवर नोटरी केलेले. |
| 6 | निविदाकार आयकर दाता असल्यास दोन वर्षातील आयकर भरणा केल्याबाबतचे आयकर विभागाचे प्रमाणपत्र किंवा आयकर सुट असल्यास तसे आयकर विभागाचे प्रमाणपत्र |
| 7 | G S T नोंदणी प्रमाणपत्र |
| 8 | निविदेत दर्शविलेल्या उपलब्ध बारदान्याची प्रत्यक्ष पाहणी करुन समाधान झाल्याचे निविदाकाराचे प्रमाणपत्र. |

१५. दराचा लिफाफा " ब " मध्ये online निविदा फॉर्म पुर्णपणे भरावा व त्यात सर्व बारदाना प्रकारनिहाय दर नमुद करावे.

१६. उपयोगी, निरुपयोगी व प्लॅस्टिक तुकडा बारदाना करीता निविदाकाराचे दर हातच्या किमतीपेक्षा जास्त येणे आवश्यक राहील.

१७. निविदाकाराने ई- निविदेमध्ये स्वत:चे/फर्मचे नाव पत्ता,भ्रमणध्वनी, दुरध्वनी क्रमांक इत्यादी अचूक माहिती देणे बंधनकारक राहील.

१८. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतांना ऐनवेळी जादा दर येणा-या निविदाकाराने निविदेतून माघार घेतल्यास अशा निविदाकारांची संपूर्ण इसारा रक्कम सरकारजमा करण्यांत येईल व अशा प्रकरणी दुस-या निविदाकाराची निविदा मंजूर करावी लागल्यास शासनाच्या होणा-या आर्थिक नुकसानीची वसूली माघार घेणा-या निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल.

१९. निविदेतील अटी व शर्तीसंबंधी बारदाना उचलीबाबत करारनामा संबंधी काही वाद निर्माण झाल्यास प्रकरण अंतिम निर्णयासाठी शासनाद्वारे नियुक्त लवादाकडे सोपविण्यात येईल व अशा प्रकरणी लवादाचा निर्णय अंतिम राहील आणि तो यशस्वी निविदाधारकास बंधनकारक राहील. लवादाच्या निर्णयापुर्वी यशस्वी निविदाधारकास उक्त वादाचे प्रकरण दिवाणी न्यायालयात दाखल करता येणार नाही.

२०. निविदेत निविदाकारास कोणतीही अट टाकता येणार नाही. अट असलेली निविदा नाकारण्यात येईल.

२१. कोणतीही निविदा मंजूर करण्याचे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी नागपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

२२. निविदा उघडतेवेळी निविदाकारास अथवा त्यांचेद्वारा प्राधिकत प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल.

२३. निविदा उघडण्याची तारीख व वेळ यामध्ये आवश्यक बदल करण्याचे किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्य करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नागपूर यांनी राखून ठेवलेले आहे.

२४. संपूर्ण निविदा प्रक्रियेकरीता जिल्हाधिकारी नागपूर हे सक्षम प्राधिकारी राहतील. संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकत किंवा अस्विकत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नागपूर यांना राहील.

जिल्हाधिकारी
नागपूर